

धुक्यातील जादू

लेखिका: मार्गारेट किम्मेल


मराठी अनुवाद : सुशील मेन्सन







कोण्या एके काळी जेव्हा, पर्वत गात असत आणि लोक ऐकत असत, *कॅडर इड्रिस* पर्वतावर बर्फाची चादर पसरत असे आणि *प्लायलिमोन* शिखर धुक्यात हरवून जात असे, तेव्हा पश्चिम वेल्स प्रांतात *थॉमस* नावाचा एक मुलगा राहात असे. समुद्रकिनाऱ्यावरील दलदलीजवळ दगडांनी बनलेल्या एका कच्च्या घरात तो राहात असे. थॉमस जादूगार बनण्यासाठी अभ्यास करत असे. तो तासनतास जादूची पुस्तके वाचत बसे, जादुचे मंत्र पाठ करत असे आणि मग त्यांचे उच्चारण करत असे. पण त्याची जादू काही फारशी प्रभावी नव्हती.



खरंतर, थॉमसची जादू त्याचे घर ऊबदार ठेवू शकेल इतपतही प्रभावी नव्हती. रोज सकाळी, थंडीपासून बचाव करण्यासाठी त्याला घरात लाकडे जाळून आग करावी लागत असे. ऊब मिळवण्यासाठी त्याला आपल्या मंत्रांचा काही उपयोग होत नसे. पाऊस पडल्यावर त्याच्या छोट्याशा झोपडीच्या छतातून पाणी गळत असे, भिंतींच्या भेगामधून गार वारा घरात शिरत असे. थॉमस आगीसाठी ठिणगी पेटवण्याव्यतिरिक्त आणखी काही करू शकत नसे.





थॉमसच्या घरी काही पाहुणेही होते. हे दलदलीतील जीव होते. त्यांनासुद्धा थोडी ऊब हवीच असते. पण थॉमस आपल्या छोट्याशा घरात फक्त एका बेडकाला सोबतीला ठेवत असे. थॉमस त्याला *जेरेमी* म्हणत असे. जेरेमी दीर्घकाळ दलदलीत राहिला होता. तो वाऱ्याचे गाणे ऐकू शकत असे. काहीवेळा, थॉमस नवा मंत्र उच्चारत असे तेव्हा जेरेमीसुद्धा त्याच्यासोबत गुणगुणत असे.




एका वादळी रात्री, समुद्राला धडकणाऱ्या पश्चिमेच्या वाऱ्याचे गीत ऐकत असताना, जेरेमी स्वत: रचलेली एक धुन गुणगुणू लागला. अचानक, वादळ शांत झाले. एक अनपेक्षित अशी शांतता पसरली. जेरेमीला आश्चर्य वाटले.

“च्च-च्च-च्च,” इतका वेळ शांत बसून जेरेमीसोबत वाऱ्याचे गीत ऐकत बसलेला थॉमस पुटपुटला. आता घराच्या बाहेरून अजिबात आवाज येत नव्हता. जेरेमी आणि थॉमस आता काय होईल, याची वाट पाहू लागले.








थॉमसने जेरेमीला उचलले आणि झोपडीबाहेर डोकावले. बाहेर जग धुक्यात हरवले होते. पलिकडची दलदल आणि समुद्र, थॉमस आणि जेरेमीची जणू वाट बघत होते. पावसाचे थेंब हवेत तरंगत होते, जणू ते जमिनीवर पडले तर ही नीरव शांतता भंग पावेल.


हा क्षण विलक्षण आहे, हे थॉमसला जाणवले. त्याने शांत दलदलीत दोन पावले टाकली आणि मग आणखी दोन पावले....मग तो गारठून गेला. सरळ पुढे, दलदलीतील गवतामध्ये काहीतरी हालचाल झाली. ही काही दखल घेण्यासारखी गोष्ट नव्हती. थॉमसने श्वास रोखून धरला.






तो सावकाश पुढे पुढे सरकू लागला. जेरेमीला आपल्या हातात धरून ठेवल्यामुळे थॉमसला जेरेमीच्या हृदयाची धडधड जाणवत होती. थॉमस आपल्या गुडघ्यांवर बसला आणि त्याने गवत बाजूला सारले. त्याला वेत आणि दलदलीने बनलेले एक घरटे दिसले. त्यात एक छोटासा ड्रॅगन होता. आजवर, थॉमसने कधी ड्रॅगन बघितला नव्हता. त्याने त्यांच्याबद्दल फक्त ऐकले नव्हते.





थॉमसचा ड्रॅगन फिक्कट हिरव्या रंगाचा होता आणि खूप तरूणही होता. त्याने आपले पंख पाठीवर आणि बाहुंवर दुमडले होते. थॉमस नजिक आल्यावर तो भीतीने थरथरू लागला. छोटासा ड्रॅगन बघून जेरेमीला आनंद झाला. तो पुन्हा गुणगुणू लागला. त्याच क्षणी, वारा पुन्हा गाणे गाऊ लागला, समुद्र गर्जू लागला आणि पाऊस पडू लागला. थॉमसने ड्रॅगनला उचलले आणि त्याला आपल्या झोपडीत आणले. त्याने घरात शिल्लक राहिलेला माशाचा तुकडा ड्रॅगनला खायला दिला. त्याला प्यायला ताजे पाणीही त्याने दिले.



तिघांसाठी तो दिवस लांबलचक ठरला. थॉमसने एका हातात जेरेमीला तर दुसऱ्या हातात ड्रॅगनला धरले, जणू त्यांना सोडले तर त्याची जादू अडणार होती. दुपारी उशीरा, त्याने एक कप चहा बनवला. ड्रॅगन शांत होता, जेरेमी पेंगत होता.

जादू झाल्यानंतर कुणीही गुणगुणत नव्हते. हातात धरून ठेवलेले जीव घाबरू नयेत, म्हणून थॉमस सावकाश पुढे झाला. हातातील जीवांना त्याने मुक्त केले आणि तो पुन्हा आग जाळायचा प्रयत्न करू लागला. लाकडाचे तुकडे नेहमीपेक्षा जास्त ओले वाटत होते. त्याच्या आग जाळायच्या जादूने फक्त धूर उत्पन्न केला आणि श्वास घेण्यास त्रास.







थॉमसला आपल्या पायाजवळ सळसळ जाणवली. तो ड्रॅगन होता. ड्रॅगन चालत चालत लाकडाच्या तुकड्याकडे जात असल्याचे पाहून थॉमसला आश्चर्य वाटले. डौलदारपणे एक श्वास घेतल्यावर ड्रॅगनच्या तोंडातून निघालेल्या आगीच्या वलयांनी थॉमससाठी आग उत्पन्न केली.





आग चांगली जळू लागेपर्यंत ड्रॅगन आगीजवळून हटला नाही. थॉमसने आगीवर चहाची किटली ठेवली आणि आगीकडे बघत तो जेरेमीच्या शेजारी बसला. जेरेमी एक गाणे गुणगुणू लागला, एक नवे गाणे ज्यामुळे आगीचे संगीत वातावरणात घुमू लागले आणि चहाच्या उकळत्या पाण्याच्या आवाजात मिसळून गेले.

ही वेळ संगीत ऐकायची होती. मग थॉमस पुटपुटला, “कृपया, मला ही धुन शिकव. मलासुद्धा गायचंय.” आग वाढत गेली, झोपडीला आणि त्यातील जीवांना ऊब देऊ लागली.





रात्री कधीतरी ड्रॅगन घर सोडून निघून गेला. पण थॉमस आणि त्याचा मित्र जेरेमी अद्याप समुद्राजवळच्या झोपडीतच राहात आहेत. काहीवेळा, दलदलीतील इतर जीव थॉमस आणि जेरेमीचे संगीत ऐकण्यासाठी तिथे थांबतात. आता घरात आग नसली तरी ऊब मात्र असते आणि वातावरण प्रसन्न असते. आता घरात पावसाचे पाणी गळत नाही आणि गार वारा भिंतींच्या भेगांमधून आत शिरत नाही. थॉमसची जादू आजही एकावेळी एकदाच चालते. पण थॉमस आणि जेरेमी वाऱ्याच्या किंवा आगीच्या किंवा ड्रॅगनच्या छोट्याशा पंखांच्या आवाजासोबत गुणगुणतात तेव्हा त्याची जादू प्रभावी होते.



